# प्रेसनोट दि. ०४/०७/२०१८

## खराडी येथील स्पा मसाज सेंटरवर छापा
## ३ सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका
## स्पा मालक अटकेत

दि.०३/०७/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, यांना पोलीस नाईक तुषार आल्हाट यांचे कडुन माहीती मिळाली की, **"केडीया स्पा हेवन"** एरीसा एव्हेन्यु येथील पहिल्या मजल्यावर, खराडी पुणे येथील मसाज सेंटरमध्ये इसम नामे सोमनाथ बनवारीलाल केडीया हा मसाज पार्लर मध्ये ठेवलेल्या थेरपीस्ट मुलींचेकडुन मसाजचे नावाखाली वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच चंदननगर पोलीस स्टेशनकडील अधिकारी कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई करुन खराडी परिसरातील **"केडीया स्पा हेवन"** एरीसा एव्हेन्यु येथील पहिल्या मजल्यावर खराडी पुणे येथे स्पा मसाज सेंटरमध्ये वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला.

छाप्या दरम्यान नागालॅन्ड राज्यातील १ व महाराष्ट्र राज्यातील २ अशा एकुण ३ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा सोमनाथ बनवारीलाल केडीया वय ४५ रा. फ्लॅट नंबर ५४२ क्लोव्हर पार्क व्हयुव, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क पुणे याचे विरुध्द चंदननगर पोलीस स्टेशन् गुन्हा रजि् नंबर १७३/२०१८, भा.दं.वि. कलम ३७०, ३७० (अ) सह पिटा ॲक्ट कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सोमनाथ केडीया यास कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. १९,८६०/- रुपये, १ मोबाईल फोन, व इतर कागदपत्रे असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु फौंडेशन, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, सपोनि चंद्रकांत जाधव, सपोनि अनिता खेडकर, तुषार आल्हाट, राजाराम घोगरे, प्रमोद म्हेत्रे, नितीन लोंढे, नितिन तेलंगे, प्रदिप शेलार, सचिन शिंदे, ननिता येळे, सुप्रिया शेवाळे, अनुराधा ठोंबरे, रुपाली चांदगुडे यांनी व चंदननगर पोलीस स्टेशनचे व.पो.नि. श्री. राजेद्र मुळीक व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.